


साप्ताहिक

# डोंगरचा राजा

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

संपादक : अनिल वाघमारे    Editor : Anil Waghmare




■ वर्ष ११ ■ अंक ३७ ■ बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

11th year, 37 th paper, Wednesday Date: 8 April 2026 , R.N.I. MAHMAR/2015/62614, Postal Permission : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 Price : Rs.1, Pages :4, Page -1

# कोणाचा द्वेष करायचा नाही, नियती सगळे काही नीट करते

## आ.धनंजय मुंडे यांचे प्रतिपादन; नारायणगड-भगवानगडाच्या सप्ताहास उपस्थिती








पाथर्डी : प्रतिनिधी

कोणी आपल्याला दोष देवो किंवा आपलं द्वेष करो, आपण मात्र कोणाला दोष द्यायचा नाही किंवा कुणाचा द्वेष करायचा नाही नियती सर्वांचा हिशोब नीट करत असते असे वक्तव्य माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्यावतीने पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे आयोजित अखंड नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते.

भक्ती, शक्ती आणि विश्वासाची भगवानगडाची परंपरा आहे. लाखो ऊसतोड कामगार आपल्या एक रुपया कमाईतील वीस पैसे देणगी भगवानगडाला देतात आणि त्यातूनच या गडाची महती आज देश विदेशात पोहोचली आहे. ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबांनी भगवान गडाची गादी ही ऐश्वर्या संपन्न बनवली ऐश्वर्या संपन्नतेची ती परंपरा आभारीत राखण्याचे काम आज गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव शास्त्री यांच्यामार्फत केले जात असल्याचे विधानही यावेळी धनंजय मुंडे यांनी केले.

भगवानगड हे आपले ऊर्जा स्थान असून भगवानगडाच्या सावलीत आपल्याला नेहमी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी व्यासपीठावर महंत डॉ. नामदेव शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री,

आईसाहेब संस्थानच्या ह. भ. प. राधाताई सानप, खा. निलेश लंके, आ. मोनिकाताई राजळे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ॲड. प्रताप ढाकणे, ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांसह आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या आधी बडेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांची जंगी मिरवणूक काढत फुलांची उधळण करत जोरदार स्वागत केले.

**महंत शिवाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद**

दरम्यान बडेवाडी येथे



जाण्याअगोदर धनंजय मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थिती लावली. यावेळी गडाचे महंत ह. भ. प. शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी ग्रामस्थानी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले, यावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हेही उपस्थित होते.

# वडवणी येथे संघटन सृजन अभियान उत्साहात







वडवणी : प्रतिनिधी

काँग्रेस पक्ष संघटन बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी वज्रमुठ आवळली.अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांच्या आदेशाने संपूर्ण देशात काँग्रेस पक्ष अधिक सक्षम करण्यासाठी संघटन सृजन अभियान राबवले जात आहे. याच अभियानाचा भाग म्हणून आज दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी वडवणी तालुका काँग्रेस कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक दुपारी २ वाजता संपन्न झाली.

आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला बैठकीनंतर दिल्लीहून आलेल्या ए.आय. सी. सी. नितुजी वर्मा मॅडम यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला यावेळी त्यांनी संघटनेची आगामी रणनीती आणि बूथ पातळीवरील बांधणी यावर विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय काँग्रेस पक्षांच्या राष्ट्रीय सदस्या नीतूजी वर्मा तसेच माजी आमदार मा. एम. एम. शेख,संघटक निरीक्षक सुरेंद्र गोडस्कर, आणि प्रदेश समन्वयक श्रीमती विद्याताई पाटील व जिल्हा उपाध्यक्ष प्रवीणजी शेप, बाळासाहेब ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज काँग्रेस भवन वडवणी येथे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष ज्ञानदेव आंधळेयांच्या नोयोजनात तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते काँग्रेस जणांच्या उपस्थितीमध्ये अभियान यशस्वी झाले.

तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचण्याचा संकल्प केला यावेळी तालुक्यातील शहराध्यक्ष शिवाजी तात्या शिंदे, पांडुरंग मस्के, तानाजी माळी, बाबासाहेब झोडगे, गणेश आडे, विजय पवार, शिवाजी कोठुळे, मोमीन पठाण, बाबासाहेब मस्के, संजय राठोड, सचिन आंधळे, शकील शेख, सज्जन आंधळे, विकास आंधळे, आदिनाथ आंधळे, गोविंदा आंधळे, भास्कर सावंत, धनराज मुंडे, विष्णू उजगरे, सुरेश उजगरे, परमेश्वर मुंडे, इंदर चोले, दादासाहेब बर्डे, यासह तालुक्यातील पदाधिकारी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘भीम विचारांची गाणी’ या गीताचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन

वडवणी : प्रतिनिधी

मानवतावादी विचारवंत प्रा. डॉ.म.सु.पगारे यांनी लिहिलेले ’ भीम विचारांची गाणी’ हे गीत आज युट्युब चॅनल वर प्रकाशित झाले. हा कार्यक्रम आभासी पद्धतीने गुगल मीट वर आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मानवतावादी विचारवंत प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी भूषविले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जेष्ठ कवी वा. ना. आंधळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात ते म्हणाले की, हे गीत पाहिल्यांना मी वाचलं आणि मग ते ऐकलं आणि त्याच्यात अत्यंत सुंदर बोध मला समजला तेव्हाच मी पगारे सरांना म्हणालो की हे गीत अत्यंत लोकप्रिय होणार आहे. यानंतर गीत मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आले.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध शाहिरी गायक मा. नागसेन दादा सावदेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, या गीताचे बोल अत्यंत तर्कशील आणि विवेकी विचारांची शिदोरी आहे आणि ती आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची आहे.कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख अतिथी प्रा विजयकुमार गवई यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यात ते म्हणाले की, हे गीत ऐकून मला वामनदादांची आठवण झाली. हे गीत आजच्या काळात अत्यंत सुंदर आणि चळवळीला शुद्ध पद्धतीने पुढे नेणारं ठरणार आहे. ग्वाही त्यांनी दिली. यानंतर या गीताचे गायक डॉ. सागर चक्रनारायण यांनी आपला गीत प्रसारित करण्यामागचा अनुभव कथन केला. नंतर सम्राट वृत्तरत्न आनंद चक्र नारायण यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सम्राट वृत्तपत्राच्या माध्यमातून पगारे सरांच्या लेखणीचा आस्वाद आम्हाला गेल्या एकवीस वर्षापासून मिळत आहे त्यांचे लेखन हे नेहमीच विचारांना दिशा देणारे असते.शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष व या गीताचे गीतकार प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. पुढे बोलतांना प्रा. डॉ. म.सु. पगारे यांनी चक्रनारायण आणि सम्राट कुटुंबा बरोबर त्यांचे कसे संबंध आहेत मग ते दलित साहित्याचा इतिहासाचे सदर असो किंवा विद्रोही सदर असो किंवा विविध ठिकाणी व्याख्यानाच्या माध्यमातून वारंवार घनिष्ट होत आहेत.



# संपादक राजेंद्र दर्डा-एस.एम. देशमुख यांची सदिच्छा भेट

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील दैनिक लोकमत च्या मुख्य कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.

पत्रकारिता क्षेत्रातील या दोन दिग्गज व्यक्तिमत्त्वांमध्ये झालेल्या या भेटीमुळे माध्यम वर्तुळात चर्चा रंगली आहे. या भेटीदरम्यान उभय नेतृत्वामध्ये पत्रकारितेसमोरील सद्यस्थिती, डिजिटल मीडियाचे वाढते महत्त्व आणि पत्रकारांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यभरात सुरु असलेल्या कामकाजाची माहिती देण्याबरोबरच येत्या १८ आणि १९ एप्रिल २०२६ मध्ये उदगीर या ठिकाणी होत असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ वे राष्ट्रीय अधिवेशनचे उद्घाटक म्हणून रितसर निमंत्रण

दैनिक लोकमत समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना

मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी दिले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची माहिती सुद्धा श्री.दर्डा यांना दिली. श्री.राजेंद्र दर्डा यांनीही लोकमतच्या प्रवासातील अनुभव सांगत पत्रकारितेची मूल्ये जपण्यावर भर दिला.

यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाट आणि लोकमत कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते. अत्यंत मनमोकळ्या गप्पा आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या भेटीने पत्रकारितेतील ज्येष्ठ आणि मार्गदर्शक नेतृत्वांमधील समन्वय पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.



## संपादकीय

# बंगाली आखाडा

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची धग दिवसेंदिवस वाढत असून भाजपने आपल्या रणनीतीने तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना चोहोबाजूने घेरायला सुरुवात केली आहे. ममता गेली पंधरा वर्षे मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या पक्षाने राज्यात निर्माण केलेली गुंडगिरी व दहशत शिगेला पोहोचली आहे. तृणमूल काँग्रेससमोर दुसरा राजकीय पक्ष उभा राहता कामा नये व दुसर्या पक्षाचे कार्यकर्ते आपल्या विरोधात रस्त्यावर उतरता कामा नयेत, असे भयग्रस्त वातावरण गेली पंधरा वर्षे पश्चिम बंगालमध्ये आहे. रामनवमीची मिरवणूक असो किंवा दुर्गा पूजा उत्सव अशा हिंदू सणांवर राज्यात कमालीचे निर्बंध असतात. मुस्लिमांचा अनुनय करण्यात ममता यांचा दुसरा कोणी हात धरू शकणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे केंद्रात सरकार आल्यापासून ममता यांना कोणी तरी जाब विचारणारा नेता भेटला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्याला वारंवार भेटी देऊन आणि आपल्या कार्यकर्त्यांना दिलासा देऊन पक्षाची संघटना गेल्या दहा वर्षांत भक्कम पायावर उभी केली आहे. ममता यांनी पंधरा वर्षांपूर्वी डाव्या पक्षांचा गड उद्ध्वस्त केला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला सत्तेवरून हटविण्याचा पराक्रम करून दाखवला, पण ममता यांची राजवट हुकूमशहा पद्धतीने चालली आहे. पूर्वी मार्क्सवादी व तृणमूल काँग्रेस यांच्यात सतत रक्तरंजित हिंसाचार होत असे. आता तृणमूलचे कार्यकर्ते भाजपला दहशत दाखवून रोखण्याचा प्रयत्न करीत असतात. तृणमूल काँग्रेसच्या दहशतीतून पश्चिम बंगालला मुक्त करण्यासाठी आणि बांगला देशी मुसलमानांची घुसखोरी रोखण्यासाठी वाट्टेल ते करून ममता व त्यांच्या पक्षाला सत्तेवरून हटविण्याचा भाजपने यावेळी चंग बांधला आहे.

अमित शहा यांच्या नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगालमधील प्रचार दौर्याने ममता बॅनर्जी अक्षरश: चेकाळल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत तृणमूल विरुद्ध भाजप अशी थेट लढत आहेच, पण अमित शहा विरुद्ध ममता असा राजकीय संघर्ष टोकाला पोहोचला आहे. गेल्या दहा वर्षांत तृणमूल काँग्रेसचे अनेक मोठे नेते ममता यांच्या मनमानीला कंटाळून भाजपमध्ये आले. त्यांना भाजपने सन्मानाने पक्षात घेतले व भयमुक्त केले. आता हेच नेते भाजपचा झेंडा हातात घेऊन ममतांच्या विरोधात हल्लाबोल करताना दिसत आहेत. अमित शहा यांनी निवडणूक प्रचारात ममता सरकारविरोधात कोलकाता येथे एक आरोपपत्रच सादर केले. तृणमूल काँग्रेसच्या १५ वर्षांच्या कारकिर्दीचा पंचनामाच या आरोपपत्रात आहे. प्रत्येक निवडणुकीत ममता या व्हिक्टीम कार्ड खेळतात व लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतात, असा आरोप शहा यांनी केला. कधी त्या डोक्याला पट्टी बांधतात, कधी पाय मोडला म्हणून व्हीलचेअरवरून प्रचाराला येतात, कधी आजारी पडतात, निवडणूक आयोगाला शिव्यांची लाखोली वाहतात, पण त्यांचे खरे स्वरूप जनतेने आता ओळखले आहे. भाजपशी टक्कर देताना आपली सत्ता टिकविण्यासाठी ममता यांना अक्षरश: आटापिटा करावा लागतो आहे.

ममता यांनी त्यांच्या धोरणामुळे बंगालचे शोषण केले आहे, देशाच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर त्या धोक्याचा खेळ खेळत आहेत आणि राज्यात गुन्हेगारी, गुंडगिरी, दहशत व बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. या तीन मुद्द्यांवरून शहा यांनी ममतांवर हल्लाबोल केला आहे. आसाममध्ये भाजपचे सरकार आल्यापासून घुसखोरी थांबली आहे. बंगालमधील घुसखोरीमुळे देशाच्या सुरक्षिततेलाच धोका निर्माण झाला आहे. बंगालमध्ये प्रशासनात भष्टाचार प्रचंड बोकाळला आहे, गुन्हेगारांच्या टोळ्या खुलेआम सामान्य जनतेला त्रास देताना दिसत आहेत. बंगालमधील सामान्य जनतेला स्वत:चा प्राण गमावण्याची अहोरात्र भीती वाटत असते, आपली मालमत्ता कोणी तरी हिसकावून घेईल, असे भय कायम असते आणि आपले स्वातंत्र्य दबावाखाली आहे, अशा दबावाच्या वातावरणात लोक जगत आहेत. आज आपल्याला उपजीविकेचे साधन आहे, ते उद्या असेल की नाही, याची शाश्वती सर्वसामान्य बंगाली नागरिकाला नाही, अशी परिस्थिती या राज्यात आहे.

ममता बॅनर्जी यांनीही भाजपवर आरोपपत्र घोषित केले आहे. भाजपचे लोक पश्चिम बंगालमध्ये दंगली व हिंसाचार घडवतात, असा त्यांनी आरोप केला आहे. भाजपमुळेच बंगालमधील वातावरण दूषित झाले आहे व हिंदू- मुस्लिम तेढ निर्माण होते आहे. राज्यात सर्व बंगाली भाषिक गुण्यागोविंदाने राहत होते, पण भाजपने त्यांच्यात भेदभाव करून आणि जातीय राजकारण खेळून राज्यातील वातावरण बिघडवले, असा आरोप ममता यांनी केला आहे. आमच्या पक्षाचे कार्यकर्तेही रामनवमी साजरी करतात, मिरवणुका काढतात; पण भाजपने त्या दिवशी दंगली घडवून उत्सवाला गालबोट लावले, असा आरोप ममता यांनी केला आहे. राज्यात निवडणुका जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाने मुख्य सचिव, गृहसचिव, पोलिस आयुक्तांपासून शंभराहून जास्त वरिष्ठ व उच्च पदांवरील अधिकार्यांना बदलले व स्वत:च्या मर्जीतील अधिकार्यांच्या नेमणुका केल्या. निवडणूक आयोगाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर अधिकार्यांच्या बदल्या यापूर्वी कधीच केल्या नव्हत्या.

# जनसेवकाच्या भूमिकेत काम करणारा तोच खरा कार्यकर्ता :राम कुलकर्णी

## वडवणी येथे भाजपाचे प्रशिक्षण अभियान उत्साहात; कार्यकर्त्यांना विचार व कार्यपद्धतीचे मार्गदर्शन




वडवणी :प्रतिनिधी

भारतीय जनता पक्ष हा सुसंस्कृत विचारांचा पक्ष असून त्याचा प्रत्येक कार्यकर्ता हा खर्‍या अर्थाने जनसेवक म्हणून कार्य करत असतो, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत वडवणी मंडळात आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.

या वेळी बोलताना कुलकर्णी यांनी कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा या कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे कार्यकर्त्यांचे वर्तन, विचार आणि आचरण हे आदर्श व पवित्र असणे अत्यंत आवश्यक आहे. पक्षनिष्ठा, शिस्त आणि नेतृत्वावर दृढ विश्वास ठेवून रात्रंदिवस परिश्रम घेणे हेच खर्‍या कार्यकर्त्याचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

देश आणि राज्यात भाजपाची सत्ता असल्यामुळे विरोधकांकडून अनेकदा चुकीचे नरेटिव्ह निर्माण करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा परिस्थितीत कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनांची सखोल माहिती घेऊन ती घराघरात पोहोचवावी आणि विरोधकांना तथ्याधारित उत्तर द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.“कार्यकर्त्याच्या तोंडात साखर, डोक्यात बर्फ आणि पायात चक्र असावे,” या शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांच्या गुणांचे प्रभावी वर्णन केले. सुमारे ४० मिनिटांच्या भाषणातून त्यांनी व्यक्तिमत्त्व विकास, सेवाभाव, संघटन कौशल्य आणि जनसंपर्क यांचे महत्त्व पटवून दिले.

भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून त्याचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान प्रत्येकाने बाळगावा, असे सांगताना त्यांनी गोरगरिबांची सेवा, विकासाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे आणि टीकेकडे दुर्लक्ष करून कृतीतून उत्तर देणे यावर भर दिला.

हिंदुत्व आणि जनकल्याण हे पक्षाचे मूलभूत विचार असल्याचे सांगत त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय व डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले. तसेच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचा आदर्श ठेवून कार्यकर्त्यांनी जनतेशी जोडलेले राहावे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी व्यासपीठावर बीड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, माजी आमदार केशवराव आंधळे, माधवराव निर्मळ, भाजपाचे ज्येष्ठ नेते सोमनाथराव बडे, शांतीलाल डोरले, माजी सभापती दिनकरराव आंधळे, सयाजी गायकवाड, भाजपाचे वडवणी तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, बाळासाहेब गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजयुमो जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी केले. या प्रशिक्षण शिबिरास सुमारे १०० हून अधिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# धुनकवाडच्या विकासासाठी कटिबद्ध राहणार:नवनाथ बन



वडवणी: प्रतिनिधी

धुनकवाड गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून ग्रामविकासासह विविध शासकीय खात्यांमधून विकासनिधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केले. ते धुनकवाड ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.

या वेळी धुनकवाड ग्रामपंचायतीतर्फे सरपंच भागवत गव्हाणे यांच्या हस्ते नवनाथ बन यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व ग्रामदैवत धुनकेश्वराची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. याचबरोबर उपस्थित मान्यवरांचाही शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या व्यासपीठावर भाजपाचे सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष प्रकाश गाडे, प्रवक्ते राम कुलकर्णी, सरपंच भागवत गव्हाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात नवनाथ बन यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होत असून ग्रामीण भागालाही विकासाच्या प्रवाहात आणण्यावर भर दिला जात आहे. धुनकवाड गावासाठी अधिकाधिक विकासनिधी मिळवून देत पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी राम कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करताना धुनकवाड ते पहाडी पारगाव या महत्त्वाच्या रस्त्यासाठी नवनाथ बन यांच्या माध्यमातून निधीची मागणी करण्यात आल्याचे सांगितले.

दरम्यान, सरपंच भागवत गव्हाणे यांच्या निवासस्थानी त्यांच्या मातोश्रींच्या हस्ते नवनाथ बन यांचे औक्षण करण्यात आले. या प्रसंगामुळे कार्यक्रमाला पारंपरिक व भावनिक रंग चढला.या कार्यक्रमास भाजपाचे धारूर तालुकाध्यक्ष संदीप काचगुंडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ज्ञानोबा बडे, दादासाहेब घोळवे, बाळराजे लगड, तात्या धुमाळ, भाजप युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, धनगर समाजाचे नेते दत्ता वाकसे, अतुल मस्के, पत्रकार अविनाश मुजमुले, देवडीचे उपसरपंच महादेव पुरी, माजी सरपंच अभिमान यादव, अरुण यादव, माजी उपसरपंच दत्ता यादव, ज्ञानेश्वर यादव, गोरख यादव, रुक्षराज कागणे, ज्ञानदेव कागणे, श्रीराम महाराज यादव, सच्चिदानंद यादव, बंकटी गोरे, मधुकर यादव, भागवत यादव, प्रकाश यादव, कचरू यादव, भिकाजी रोटे, हरीराम यादव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सरपंच भागवत गव्हाणे यांनी केले, सूत्रसंचालन पत्रकार जगदीश गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन बहादूर कुलकर्णी यांनी मानले.

### धुनकेश्वर नगरीत अनुभवलेलं प्रेम अविस्मरणीय

धारूर तालुक्यातील धुनकवाड येथे दिलेल्या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी केलेल्या आत्मीय स्वागताने भारावून गेल्याची भावना भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी व्यक्त केली आहे. “बीड जिल्ह्यातील धुनकवाडच्या मातीत अनुभवलेलं प्रेम मनात कायमचं घर करून गेलं,” असे त्यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे नमूद केले. नवनाथ बन यांच्या धुनकवाड भेटीवेळी ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात व जल्लोषात त्यांचे स्वागत केले. गावात वाजत-गाजत मिरवणूक काढत फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. धुनकवाड ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या भेटीदरम्यान सरपंच भागवत गव्हाणे स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला.यानंतर सरपंच भागवत गव्हाणे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता मातोश्रींनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे स्वागत केले. या स्नेहपूर्ण आणि आत्मीय आदरातिथ्यामुळे नवनाथ बन भावूक झाले.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री प्रशांत तुकाराम जोशी, पत्ता : रा. ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ३९८ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. २६४० साईज पु.प.३० फुट, द.ऊ.४० फुट अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः नवले, पश्चिमः३० फुटचा रस्ता, दक्षिणः२० फुटचा रस्ता, उत्तरः अशोक आजबे

दिनांक : ७/०४/२०२६

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री अशोक मुंजाबा आजबे, पत्ता : रा.चिंचाळा, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ६६१ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. २८४३ साईज पु.प.३० फुट, द.ऊ.४० फुट अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः रामलिंग गव्हाणे, पश्चिमः नाला, दक्षिणः१५ फुट, उत्तरः क्षीरसागर

दिनांक : ७/०४/२०२६

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री अशोक मुंजाबा आजबे, पत्ता : रा.चिंचाळा, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ३९८ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र.२६४० साईज पु.प.३० फुट, द.ऊ. ४० फुट अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः नवले, पश्चिमः ३० फुटाचा रस्ता, दक्षिणः प्रशांत जोशी, उत्तरः डिगे व मेत्रेची जागा

दिनांक : ७/०४/२०२६

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री बालाजी गिन्यानदेव चाटे, पत्ता : रा.ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ३९९ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र.३७४९ साईज पु.प.१५ फुट, द.ऊ. १०० फुट अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः तुकाराम डोंगरे, पश्चिमः दादासाहेब जाधवर, दक्षिणः बीड-परळी रोड, उत्तरः प्लॉट ०६

दिनांक : ७/०४/२०२६

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री गणेश पंडीत तारळकर, अशोक राजाराम भागवत पत्ता :१. परंडा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद, २. अहमदनगर

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ४४६ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. साईज पु.प.१५.२४ मी., द.ऊ. १२.१९ मी अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः माने, पश्चिमः आबुज, दक्षिणः विक्रेता, उत्तरः रस्ता

दिनांक : ७/०४/२०२६

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**



# धुनकवाड येथे धुनकेश्वर यात्रा उत्साहात साजरी

वडवणी:प्रतिनिधी

धुनकवाड येथील ग्रामदैवत असलेल्या धुनकेश्वराची वार्षिक यात्रा यंदा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच गावात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

धुनकवाड नं.१ येथून पारंपरिक पद्धतीने वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत यात्रेची सुरुवात करण्यात आली. गावातील प्रमुख मार्गांवरून निघालेली ही भव्य मिरवणूक धुनकवाड नं.२ येथे पोहोचली. या वेळी कावडी व काठी घेऊन भक्तांनी जल्लोषात सहभाग नोंदवला.यात्रेदरम्यान तरुणांनी लेझीम सादर करत वातावरण अधिक रंगतदार केले. “हर हर महादेव” च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक संस्कृतीचा सुंदर संगम या यात्रेत पाहायला मिळाला. यानंतर मिरवणूक महादेव मंदिरात पोहोचली, जिथे विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. धुनकेश्वराच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.या यात्रेनिमित्त धुनकेश्वर देवस्थान समिती व ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.धार्मिक परंपरा जपत गावकर्‍यांनी एकोप्याने ही यात्रा साजरी केल्याने धुनकवाड गावाची ओळख पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

# वाघोरा येथील भीमजयंती कार्यकारिणी जाहीर

माजलगाव :प्रतिनिधी





तालुक्यातील वाघोरा येथे दरवर्षीप्रमाणे विश्वभूषण महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बैठक घेऊन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली ती पुढीलप्रमाणे अध्यक्षपदी इंजि.शुभम भास्करराव माने, उपाध्यक्ष राहुल रामकिसन माने, सचिव अक्षय शिरसाट, सहसचिव ऋषिकेश माने, खजिनदार शंकर माने, कोषाध्यक्ष यशपाल मोरे,आदींचा समितीमध्ये समावेश आहे. बैठकीला उपस्थित ग्रामपंचायत सदस्य राहुल शिरसाठ,अण्णाभाऊ माने ज्ञानेश्वर माने, सुंदर माने, मनोहर माने,बबन माने, सिद्धार्थ माने, कारभारी माने, श्रीमंत माने, भागवत माने, उत्तम माने,बाळू मोरे, राहुल मोरे,प्रमोद माने, संभाजी सपाटे,नितीन शिरसाट, दीपक भिसे, नितीन मकरंद, दादा ससाने, प्रेमकुमार माने , यांच्यासह मोठ्या संख्येने गावातील नागरिक उपस्थित बैठक पार पडली.

तसेच जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर,रांगोळी स्पर्धा,भाषण स्पर्धा,भीम गीतांचा ऑर्केस्ट्रा तर २७ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरात फुलांची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.


# वडवणी ते साळिंबा रस्त्याच्या कामाची चौकशी करून कारवाई करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी दिला तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय अंतर्गत वडवणी ते साळींबा या साडेपाच किलोमीटर रस्त्याचे व पुलाचे कामे अत्यंत बोगस करण्यात आलेले तरी या कामांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तहसीलदार व उपविभागीय अधिकारी सा. बा. वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत व इतरांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय वडवणी अंतर्गत वडवणी ते साळींबा अंदाजे ५.३० कि.मी रोडचे काम गेल्या काही महिन्यापुर्वी झालेले असुन सदरील काम हे करोडो रुपये शासनाने खर्च करुन करण्यात आलेले असुन सदरील काम हे शासन नियमानुसार व इस्टीमेंन्ट नुसार झालेले



नसुन गुत्तेदार (एजन्सीने) हे काम थातुरमातुर केलेले आहे.तरी काही महिन्यातच सदरील रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले आहेत व सदरील रोड वरील पुलाचे काम ही निष्कृष्ट दर्जाचे झालेले आहेत. २० ते २५ गावच्या ग्रामस्थांना व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तरी वडवणी ते साळींबा या ५.३० कि.मी अंतराच्या कामाची वरिष्ठ कंट्रोलर मार्फत चौकशी करुन सदरील गुत्तेदार (एजन्सी) यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. व या रोडवरील पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्ती करावेत. नसता या रोडवरुन ये जा करणारे ग्रामस्थांना सोबत घेवुन राष्ट्रवादी कॉग्रेस च्या वतीने माजलगांव मतदार संघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके साहेब यांच्या आदेशावरुन तिव्र अंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी सा. बा. वडवणी, मा. आमदार प्रकाशदादा सोळंके साहेब, मा. तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय, वडवणी यांना काल दिनांक चार एप्रिल रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे महादेव सावंत, गौतम बादाडे, आबासाहेब बादाडे, रतन राऊत,लक्ष्मण सावंत,लहु नीर्मळ , सदाशिव चव्हाण,आबासाहेब आडे,नितीन झोडगे इत्यादींनी दिला आहे.

# अप्पा बोडके यांच्या प्रामाणिकपणाचे कौतूक

वडवणीःप्रतिनिधी

धुनकवाड येथे ग्रामदैवत धुनकेश्वराच्या यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी उसळली होती. यात्रेच्या उत्साहात दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये धावपळ सुरू असताना एक प्रामाणिकपणाची प्रेरणादायी घटना घडली आहे. धुनकवाड येथील सुभाष प्रकाश यादव यांची मुलगी वैष्णवी हिची गर्दीत बॅग हरवली होती. वैष्णवी ही माहेरी गावातील धुनकेश्वर यात्रेसाठी दर्शनाला आली होती.

हरवलेल्या या बॅगेमध्ये पर्स असून त्यात सुमारे तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने ठेवलेले होते. बॅग हरवल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता पसरली होती. यात्रेतील प्रचंड गर्दीमुळे बॅग परत मिळण्याची शक्यता कमी असल्याचे वाटत असतानाच एक दिलासा देणारी घटना घडली.

दरम्यान हीच बॅग धुनकवाड येथील रिक्षाचालक आप्पा बोडके यांना सापडली. बॅगमध्ये मौल्यवान सोनं असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतरही त्यांनी कोणताही मोह न बाळगता प्रामाणिकपणाचा आदर्श दाखवला. त्यांनी तत्काळ बॅगेतील माहितीच्या आधारे संबंधित मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली.

काही वेळातच त्यांनी सुभाष यादव यांचा संपर्क शोधून काढला आणि बॅग त्यांच्या स्वाधीन केली. हरवलेली बॅग आणि त्यातील सोन्याचे दागिने सुरक्षित परत मिळाल्याने यादव कुटुंबियांनी मोठा सुटकेचा निःश्वास सोडला. त्यांनी आप्पा बोडके यांचे मनःपूर्वक आभार मानत त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले.

या घटनेची माहिती गावात व परिसरात पसरताच नागरिकांकडून आप्पा बोडके यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आजच्या काळात पैशाच्या मोहापायी अनेक अनैतिक प्रकार घडत असताना आप्पा बोडके यांनी दाखवलेला प्रामाणिकपणा समाजासाठी एक आदर्श उदाहरण ठरत आहे. धुनकेश्वर यात्रेसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यात घडलेली ही घटना प्रामाणिकपणा, विश्वास आणि मानवतेचा संदेश देणारी ठरली असून, ''प्रामाणिकपणा अजूनही जिवंत आहे'' हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



# वडवणीत श्री.हनुमान जन्मोत्सव हर्षोल्हासात साजरा

## हजारो भाविकांची उपस्थिती - महाप्रसादाचाही घेतला लाभ

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिर याठिकाणी काल दि.२ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी श्री.हनुमान जन्मोत्सव मोठ्या हर्षोल्हासात व उत्साही वातावरणात भक्तीभावाने साजरा करण्यात आला. सकाळी ठीक सव्वा सहा वाजता सूर्योदयाबरोबर मारोतीरायाचा हा जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला. त्यानंतर संपूर्ण शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली व याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचाही हजारो भाविकांनी मनमुराद लाभ घेतला.

वडवणी येथील यंदाचा श्री.हनुमान जन्मोत्सव काहीसा आगळावेगळा होता. कारण मंदिराच्या मनमोहक व आकर्षक अशा सुशोभीकरणानंतर हा पहिलाच हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येत होता. त्याचबरोबर याठिकाणी प्रथमच कढी, भात, लापशी अशा महाप्रसादाचेही हजारो भाविक भक्तांसाठी आयोजन करण्यात आलेले होते. यामुळे यंदाचा हा हनुमान जन्मोत्सव आगळावेगळा तर ठरलाच शिवाय भाविकांच्या उपस्थितीमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले. गुरुवारी सकाळी ठीक सव्वा सहा वाजता सूर्योदयाबरोबर याठिकाणी हनुमान जन्मोत्सव संपन्न झाला. याप्रसंगी भाविकांनी गुलालाची व फुलांची मुक्त उधळण करत व फटाक्यांची प्रचंड आतिषबाजी करत मारोतीरायाच्या जन्माचे स्वागत केले. तसेच अनेक भाविकांनी याप्रसंगी गुळ व मसाला दूध यांचे तर देवस्थान समिती पंच कमिटी यांच्यावतीने मोतीचूर लाडू यांचे सर्व भाविकांना वाटप केले. याप्रसंगी पुरुष भाविकांसोबतच महिला भाविक व तरुण युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर टाळ मृदंगाच्या गजरात संपूर्ण शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. व लागलीच महा प्रसादाच्या पंगतींनाही सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी हजारो भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा आनंद घेतला. यावेळी संपूर्ण परिसरामध्ये भक्तीमयी वातावरण निर्मिती झाल्याचे पहावयास मिळाले. या जन्मोत्सव सोहळ्याच्या यशस्वीते साठी संयोजन समितीच्या असंख्य तरुण युवकांनी परिश्रम घेतले.

# सरपंच भागवत गव्हाणे यांच्या पुढाकारातून धुनकवाड -पहाडी पारगाव रस्ता झाला दर्जेदार

वडवणीःप्रतिनिधी

धारूर तालुक्यातील धुनकवाड ते पहाडी पारगाव या महत्त्वाच्या रस्त्याची अखेर दुरुस्ती होऊन तो दर्जेदार करण्यात आला असून या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता अतिशय खराब अवस्थेत होता. खड्डे, उखडलेला डांबरी भाग आणि पावसाळयात चिखलामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

धुनकवाड ते पहाडी पारगाव हा रस्ता सुमारे ३० वर्षांपूर्वी तयार करण्यात आला होता. मात्र त्यानंतर योग्य देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली होती. या रस्त्यावरून दररोज शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच वाहनधारकांना प्रवास करावा लागत असल्याने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

या पार्श्वभूमीवर धुनकवाडचे सरपंच भागवत गव्हाणे यांनी पुढाकार घेत संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत डीपीडीसी (जिल्हा नियोजन व विकास समिती) योजनेतून या रस्ता दुरूस्तसाठी निधी मंजूर करण्यात आला. निधी मंजूर झाल्यानंतर तात्काळ कामाला सुरुवात करून रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आले.

नवीन रस्ता दर्जेदार पद्धतीने तयार करण्यात आल्याने वाहनचालकांना आता सुरक्षित



आणि सुलभ प्रवास करता येत आहे. तसेच शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची वाहतूक करणे सोपे झाले असून विद्यार्थ्यांनाही शाळेत जाण्यासाठी मोठी सुविधा निर्माण झाली आहे.रस्ता पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी धुनकवाडचे सरपंच भागवत गव्हाणे यांचे आभार व्यक्त केले आहेत. अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून आता प्रवास करताना त्रास होत नाही अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.या कामामुळे धुनकवाड व पहाडी पारगाव परिसरातील विकासाला गती मिळणार असून भविष्यात अशाच प्रकारे इतर विकासकामांनाही चालना मिळेल अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.


### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

जाहिरनामा
दि.०७/०४/२०२६
अर्जदाराचे नाव श्री. रामा शिवराम विभुते
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- १) श्री. लाला पि. शिवराम विभुते २) कैलास ३) बाळू
पि. रामा विभुते
प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. २४६७ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पि.टी.आर.प्रमाणे
पुर्व - पि.टी.आर.प्रमाणे
पश्चिम - पि.टी. आर. प्रमाणे
दक्षिण - पि.टी.आर.प्रमाणे
उत्तर - पि.टी.आर.प्रमाणे
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०७/०४/२०२६
अर्जदाराचे नाव - श्रीमती. अयोध्या भगवान साबळे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. कौसाबाई आसाराम राठोड
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५२९ प्लॉट क्र.०२ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम दक्षिण बाजू १३ मीटर उत्तर बाजू १०.८० मीटर दक्षिणोत्तर पुर्व बाजू ९.२५ मीटर पश्चिम बाजू ९ मीटर एकुण क्षेत्रफळ १०७.८० चौ.मी.
पुर्व - ०९ मीटर रस्ता, पश्चिम - प्लॉट क्र.०३
दक्षिण - विक्रेती,
उत्तर - ०९ मीटर रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०७/०४/२०२६
अर्जदाराचे नाव १) श्री. अर्जुन विश्वनाथ राऊत २) श्री. योगेश विश्वनाथ राऊत
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव-
प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. ३९५१ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर १८५ फुट एकुण क्षेत्रफळ ५५५० चौ. फुट
यापुर्वीची चर्तुःसिमा आताची चर्तुः सिमा
पुर्व - राऊत , राऊत
पश्चिम - रस्ता रस्ता
दक्षिण - उजगरे उजगरे
उत्तर - रस्ता रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६
अर्जदाराचे नाव - श्रीमती. प्रभावती भ्र. बब्रुवान डोंगरे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. बब्रुवान सुर्यभान डोंगरे
प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. १५११ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर २० फुट एकुण क्षेत्रफळ ६०० चौ. फुट
पुर्व - पि.टी.आर.प्रमाणे
पश्चिम - पि.टी.आर.प्रमाणे
दक्षिण - पि.टी.आर.प्रमाणे
उत्तर - पि.टी.आर.प्रमाणे
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०७/०४/२०२६
अर्जदाराचे नाव - श्री. कृष्णा माणिक मुंडे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. ओम प्रदीप पांढरे
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५२८ मिळकत क्र. ४०६८ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ६० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ १६७.२८ चौ.मी.
पुर्व - लुंकड
पश्चिम - २५ फुट रस्ता
दक्षिण - रस्ता
उत्तर - शेख वसीन शेख हासन
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

### महाराष्ट्र शासन
**कृषि विभाग**
**कार्यालयः-उप-विभागीय कृषि अधिकारी,बीड.**
**ई-निवीदा क्र.(०७)/कृषि विभाग/जशिअ २.०/२०२५-२६**

उप-विभागीय कृषि अधिकारी,बीड यांच्या वतीने नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून बी-१ नमुन्यात ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. निवीदेची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक १७/०४/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यन्त उपलब्ध आहे.

**कामाचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | १ टक्का इसारा रक्कम | २ टक्का सुरक्षा अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोरी निवीदा किम्मत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कंपार्टमेंट बंडींग गट क्र- १,२ नवाबपुर, ता.जि.बीड. | १२४३५८१/- | १२४३६/- | २४८७२/- | ३० दिवस | ५९०/- | सु.बे.अ. |
| २ | कंपार्टमेंट बंडींग गट क्र- १,२,३ परभणी केसापुरी ,ता.जि.बीड. | १६७४३९५/- | १६७४४/- | ३३४८८/- | ३० दिवस | ५९०/- | खुला |
| ३ | कंपार्टमेंट बंडींग गट क्र- ४,५,६ परभणी केसापुरी ,ता.जि.बीड. | १७४८०६३/- | १४७८१/- | ३४९६१/- | ३० दिवस | ५९०/- | खुला |

जिमाका/बीड/जाहि/२०२६-२७/०१

उपविभागीय कृषि अधिकारी
बीड

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.८ एप्रिल २०२६ । पान ४


## माजलगावात वंचित आघाडीचे केंद्र सरकारविरोधात निषेध आंदोलन

माजलगाव: वंचित बहुजन आघाडी, माजलगाव तालुक्याच्या वतीने केंद्र सरकारविरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. वाढत्या गॅस सिलेंडर दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले. तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारने तातडीने गॅस दर कमी करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, यावेळी धम्मानंद भाऊ सळवे, अंकुशराव जाधव, भारत तांगडे, सचिन उजगरे , शत्रुघ्न कसबे, रामेश्वर उदमले, सर्जेराव शिंदे, किशोर कांबळे, महादेव पौळ, भानुदास साळवे, सिद्धार्थ पौळ,विष्णू शेरकर, उमाकांत खोपे,विजय साळवे,धम्मानंद साळवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# चिंचवण पर्यटनस्थळ होणार:आ.प्रकाश सोळंके

## सव्वापाच कोटी रुपयांच्या कामांचे भुमिपूजन;हनुमान मंदिराच्या सभामंडपासाठीही १५ लाखांची घोषणा









वडवणी :प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण येथील जोड महादेव मंदिर तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिर या स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी ५ कोटी २८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या विविध विकासकामांचा भुमिपूजन सोहळा माजलगांव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके व बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.५ रविवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

वडवणी तालुक्यातील डोंगरपट्यातील चिंचवण येथे अतिशय पुरातन काळातील हेमाडपंथी मंदिर आहेत. यात जोड महादेव मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, जगदंबा देवीचे मंदिर हे या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेले पूर्वीचे हेमाडपंथी मंदिरे आहेत. आता याच ऐतिहासिक रचनेनुसारच या मंदिरांची पूर्नबांधणी करुन संवर्धन केले जाईल. या मंदिराचा पर्यटनाच्या दृष्टीने माजलगांव मतदारसंघ विकसीत करण्याचा आमचा ठाम मानस आहे. आगामी काळामध्ये चिंचवण हे सर्व सोयींनी सुसज्ज असे पर्यटन स्थळ करण्याच्या दृष्टीने आमचा प्रयत्न असेल त्यासाठी येणाऱ्या भाविकांना राहण्यासाठी सर्व सोयीयुक्त भक्त निवासाचीही सोय करण्याचा आमचा प्रयत्न असेल असेही आमदार प्रकाश सोळंके यांनी बोलतांना बाोळी सांगितले. दरम्यान माजलगांव

मतदार संघातील समृध्द ऐतिहासिक मंदीरे बात पुरुषोत्तम पूरी येथील मंदीर, केसापुरी कॅम्प येथील केशवराजाचे मंदिर, किल्ले धारुर येथील ऐतिहासिक किल्ला, आपल्या चिंचवण येथील हेमाडपंथी वास्तुकलेचे मंदीरे अशा आपल्या माजलगांव मतदारसंघाला लाभलेला इतिहास शोधण्यासाठी दादांनी गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न केले. हा ऐतिहासिक वारसा येणाऱ्या पिढ्यांसाठी जतन करणे आणि पर्यटनाला चालना देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच दृष्टीने पुरातत्त्वदृष्ट्या महत्त्वपूर्ण मंदिरांचे जतन व संवर्धनाचे काम दादांनी हाती घेतलेले आहे. विकासाच्या दृष्टिकोनातून मंदिराबरोबर वडवणी ते धारूर या रोडसाठी १८ कोटी रुपयांची मंजुरीही मिळाली असल्याचे यावेळी जयसिंग भैय्या सोळंके यांनी बोलतांना सांगितले. याप्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते सोमनाथराव बडे यांनी गावाला लाभलेल्या ऐतिहासिक मक्रध्वज मंदिर हे ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून उभारले आहे. ज्याप्रमाणे मुलाचे मंदिर उभारले त्याप्रमाणे वडिलांचे म्हणजेच हनुमानाचेही मंदिर लोकवर्गणीतून उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी सभामंडपाची मागणी केली. यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनीही सोमनाथराव बड़े व ग्रामस्थांच्या मागणीनुसार तातडीने या हनुमान मंदिराच्या सभामंडपासाठीही १५ लक्ष रुपयांच्यानिधीची घोषणा सर्वासमक्ष केली. या कार्यक्रमासाठी नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,माजी नगराध्यक्ष राजाभाऊ मुंडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, युवक राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे, शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे, बाजार समितीचे सभापती संभाजी शिंदे, युवा नेते बाबरी मुंडे, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, नगरपंचायत गटनेते अस्लम कुरेशी, बाजार समितीचे संचालक सचिन लंगडे,

युवा नेते गणेश मुंडे, नगरसेवक राहुल घाडगे, संचालक भगवानराव लंगे, माजी उपसभापती संदिपान खळगे, सरपंच महादेव शेंडगे, तालुका उपाध्यक्ष अंगद घुगे, तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत, संचालक रणजीत मस्के, संचालक डॉ. दत्तात्रय दुधाने, माजी सभापती महादेव आंबुरे, संचालक नारायण शेळके, नगरसेवक इस्माईल पठाण, माजी सरपंच विश्वास आगे, सरपंच संतोष कदम, सरपंच राज पाटील, माजी सरपंच माऊली सुरवसे, युवा नेते संतोष पवार, युवा नेते आनंद काळे, युवा नेते सतिश खोटे, कॉन्ट्रॅक्टर दिनकर करांडे, सोमनाथ दराडे, अभिमान कदम, शामराव जाधव, वैभव मस्के, रमेश गवळी, लखन महागोविंद, गोविंद बादाडे, रामकृष्ण बादाडे, अंकुश नाईकवाडे, चेअरमन आसाराम बडे, बिबीशन पोटे, माजी सैनिक गोपीनाथराव बडे, माजी सैनिक विठ्ठलराव गिलबिले, युवा नेते राहुल बडे, ह.भ.प. पुरुषोत्तम कोठुळे, सरपंच राजेश नेटके,

उपसरपंच मयूर बडे, बद्रीनाना मात्रे, गणेश कोठुळे, शेख मन्सूर, दत्तोपंत तुरे, अमोल पौळ, इंद्रसेन बडे, यशवंत धायतिडक, नवनाथ तांबडे, महारुद्र जोशी, प्रल्हाद मात्रे, आबेद भाई शेख, योगेश मात्रे, अरुण बड़े, अशोक मात्रे, नितीन कोठुळे सह आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आबेदभाई शेख यांच्या निवासस्थानी दादांची भेट व स्नेहभोजन

दरम्यान चिंचवण येथील या भुमिपूजन सोहळ्याप्रसंगी आमदार प्रकाश दादा सोळंके तसेच सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांनी आवर्जून आपल्या सर्व टीमसह चिंचवण येथील माजी उपसरपंच तथा दादांचे निष्ठावंत कार्यकर्ते आबेदभाई शेख यांच्या निवासस्थानी आवर्जून भेट देवून त्यांच्याशी व कुटुंबियांशी संवाद साधला. तसेच त्यांच्या घरी स्नेहभोजनाचाही प्रेमपूर्वक आस्वाद घेतला. आपल्या कार्यकर्त्यांवर जिवापाड करणारे नेतृत्व म्हणजे दादा होय. दादांवर जेवढे प्रेम कार्यकर्ते करतात किंबहुना त्यापेक्षा थोडं अधिक प्रेम दादा हे आपल्या कार्यकर्त्यांवर करतात हे पुन्हा एकदा यातून अधोरेखित झाले आहे.



# अॅड.आनंद काळे यांच्या श्रद्धेला आ. प्रकाश सोळंके यांचा मान

वडवणी:प्रतिनिधी

चारदरी येथील हनुमान मंदिर परिसरात पार पडलेल्या संकल्पपूर्ती कार्यक्रमात श्रद्धा, विश्वास आणि भावनांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. या कार्यक्रमात सहभागी होताना उपस्थित मान्यवरांनी भक्तांच्या निखळ प्रेमाची जाणीव व्यक्त केली.

राष्ट्रवादीचे युवा नेते अॅड. आनंद काळे यांनी आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या विषयी मनात ज्या श्रद्धा आणि निष्ठेने संकल्प केला होता तो संकल्प पूर्ण झाल्याचा आनंद या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना आ.प्रकाश सोळंके म्हणाले, या प्रेमाचा मी ऋणी आहे. अॅड. आनंद काळे यांनी ज्या भावनेने संकल्प केला त्या भावनेचा मी मनापासून आदर करतो.चारदरी हनुमान मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. संकल्पपूर्ती निमित्ताने महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पुढे बोलताना आ. सोळंके यांनी सांगितले की, जनतेचा असा निखळ विश्वास आणि प्रेम हेच माझ्या कार्याला बळ देणारे आहे. या विश्वासामुळेच मी जनसेवेत अधिक समर्पित आणि सक्षमपणे काम करू शकत आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक पातळीवर समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# वडवणी तालुक्यात भाजपची कार्यकारिणी जाहीर; नव्या चेहऱ्यांना मिळाली संधी

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात भारतीय जनता पक्षाची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही कार्यकारिणी ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, माजी आमदार केशवराव आंधळे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख तसेच युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे यांनी जाहीर केली.


यामध्ये महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी ज्योत्स्नाताई बालासाहेब बादाडे यांची निवड करण्यात आली असून, किसान मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी बालासाहेब शेंडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुका कार्यकारिणीत भागवत चोले, रामधन नागरगोजे, सुधाकर मस्के, गणेश आजबे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. बापू मुंडे, सतीश पवार व प्रताप सावंत यांची सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून भगवान मुंडे यांच्याकडे कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सचिवपदी आप्पा चव्हाण, रमेश डोंगरे आणि आदिनाथ तोंडे यांची निवड झाली आहे. तसेच भाजपच्या फादर बॉडीमध्येही विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. उपाध्यक्षपदी नवनाथ तुरे, इंदरराव मुंडे, नारायण काळे, मुकुंद सुरवसे, देविदास चोले, गणेश टकले यांची निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी गणेश जाधव, राम नागवे, नवनाथ लंबाटे, दादासाहेब तोगे, विलास आंधळे आणि चंद्रकांत चोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी शिवाजी देवकते यांची निवड झाली आहे. सचिवपदी शाम यादव, गोविंद अंबुरे, दत्ता गोंडे, नागुराव राठोड, दिपक आजबे, बालासाहेब राऊत आणि लक्ष्मण मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून अर्जुन मुंडे, विठ्ठल शिंदे, बळी करडकर, सत्यप्रेम बडे आणि महादेव खराडे यांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर वडवणी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आगामी काळात पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी ही कार्यकारिणी महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस वडवणी तालुका बीएलओ प्रमुखपदी गणेश टिकुळे

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या बी एल ओ तालुका प्रमुख पदी श्री गणेश टिकुळे यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. या निवडी बद्दल त्यांचे तालुका अध्यक्ष महादेवराव जमाले व टीमच्या वतीने यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा गावचे रहिवाशी असणारे तरुण युवक श्री गणेश शिवाजी टिकुळे यांची नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वडवणी तालुका बीएलओ प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येय धोरणे तसेच राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खा. श्री. शरदचंद्र पवार यांचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहुन पुढील काळात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तालुक्यातील बूथ निहाय मतदार यादीचे काम करून घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल तालुका अध्यक्ष महादेवराव जमाले यांनी यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी आत्माराम जमाले,शहादेव लोंढे सह आदींची उपस्थिती होती.









This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Waghmare Anil Shriram at Pragati Offset , Panchshilnagar, Wadvani, Tq. Wadvani, District. Beed, Maharashtra-431144 and published at the office of Weekly Dongarcha raja, Main Road, Wadvani, Tq. Wadvani, District Beed, Maharashtra- 431144, email:dongarcharaja@gmail.com, Mo.9422591805 (Not every news and artical in this issue has to be agreed upon by the editor, under the Wadvani court of appeals)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)